महाराष्ट्र शासन

<u>अत्यंत तातडीचे</u>

क्रमांक करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य ५
सार्वजनिक आरोग्य विभाग
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार
कॉम्प्लेक्स बिल्डिंग, नविन मंत्रालय,
मुंबई-४०० ००१
दिनांक- १८ मार्च २०२०

प्रति,

आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)
पोलीस आयुक्त (सर्व)
पोलीस अधिक्षक (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व

**विषय: राज्यात करोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत ( १२ देशातील प्रवाशांचे अलगीकरण व विलगीकरणाबाबतच्या मार्गदर्शक सूचना)..**

**संदर्भ:** सार्वजनिक आरोग्य विभाग समक्रमांक अधिसूचना दिनांक १३ व १४ मार्च २०२०

राज्यात करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना म्हणून केंद्र व राज्य शासनाकडून यापुर्वी नमूद केल्यानुसार दिनांक १५ फेब्रुवारी २०२० व त्यानंतर चीन, इटली, इराण, दक्षिण कोरीया, फ्रान्स, स्पेन, जर्मनी या करोनासंसर्ग बाधित सात देशातून / या देशामार्गे अथवा या देशांस भेट देऊन आलेल्या प्रवाशांची विमानतळावर तपासणी करुन त्यांना अलगीकरण (Quarantine) व आवश्यकतेनुसार विलगीकरण (Isolation) करणे अनिवार्य करण्यात आलेले होते.

आता आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक सूचना लक्षात घेऊन व विमानतळावरील प्रवाशांच्या तपासणीनंतर तसेच करोना बाधित रुग्णांची तपासणी व प्राप्त माहितीच्या विश्लेषणानुसार आज दिनांक १८ मार्च २०२० पासून उपरोक्त नमूद सात देशांच्या यादीत खालील देशातील प्रवास करुन आलेल्या व्यक्तींचा समावेश करण्यात आलेला आहे यांचेसह आता १५ फेब्रुवारी २०२० नंतर, खाली नमूद केलेल्या देशांतील, देशांमार्गे अथवा या देशांस भेट देऊन आलेल्या प्रवाश्यांचेही अलगीकरण (Quarantine) व आवश्यकतेनुसार विलगीकरण (Isolation) करणे राज्य शासनाकडून अनिवार्य करण्यात आलेले आहे.

१. संयुक्त अरब एमिरेट्स (यु. ए. ई.),
२. कतार
३. ओमान
४. कुवेत
५. यु.एस.ए. (अमेरिका)

अलगीकरण व विलगीकरणाबाबत उपरोक्त १२ देशांतील, देशांमार्गे अथवा या देशांस भेट देऊन आलेल्या प्रवाश्यांचे बाबतीत आज दिनांक १८ मार्च २०२० पासून खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना अंमलात आणण्यात याव्यात.

प्रवाशांच्या तपासणीअंती त्यांची विभागणी त्यांच्यातील लक्षणांच्या आधारे खाली नमूद केल्याप्रमाणे अ, ब, व क प्रवर्गात (A, B and C category) करण्यात यावी.

**" अ " प्रवर्ग - अतिजोखीम (Category A - High Risk)**

या प्रवाशांमध्ये ताप, सर्दी खोकला व श्वास घेण्यास त्रास होणे ही लक्षणे दिसून येत आहेत तसेच त्यांनी कोव्हीड १९चा प्रादुर्भाव असलेल्या उपरोक्त देशांमध्ये प्रवास केलेला आहे किंवा गेल्या १४ दिवसांत उपरोक्त देशातून प्रवास केलेल्यांच्या संपर्कात आले आहेत असे सर्व प्रवासी अतिजोखीमीचे ठरविण्यात आले आहेत

आवश्यक कार्यवाही : अशा " अ " प्रवर्गातील सर्व प्रवाशांचे विलगीकरण करुन त्यांना विर्निदिष्ठ रुग्णालयात दाखल करणे अनिवार्य राहील.

**"ब" प्रवर्ग - मध्यम जोखीम (Category B - Moderate Risk) -**

उपरोल्लेखीत कोणत्याही देशातून आलेले प्रवासी ज्यांच्यात " अ " प्रवर्गाची लक्षणे दिसून आलेली नाहीत, तथापि, ज्यांचे वय ६० पेक्षा अधिक आहे किंवा उच्च रक्तदाब, मधुमेह, दमा, कर्करोगग्रस्त प्रवासी किंवा कोणतेही प्रत्यारोपण झालेले, इम्यूनो सप्रेसिव्ह थेरपी चालू असलेल्या प्रवासी या प्रवर्गात येतील.

**आवश्यक कार्यवाही**: अशा प्रवाशांच्या बाबतीत विमानतळावरील कार्यरत वैद्यकीय चमुने तात्काळ तपासणी करुन त्यांना राज्य शासनाने विर्निदिष्ठ केलेल्या अलगीकरण कक्षात (Quarantine) पुढील १४ दिवस वैद्यकीय निगराणीखाली ठेवावे. या कालावधीत त्यांना सर्दी,ताप, खोकला किंवा श्वसनास त्रास यापैकी काही लक्षणे आढळून आल्यास त्यांना तात्काळ विनिर्दिष्ठ विलगीकरण कक्षात दाखल करण्यात येईल.

**" क " प्रवर्ग - कमी जोखीम (Category B - Low Risk) - .**

उपरोल्लेखीत कोणत्याही देशातून आलेले प्रवासी तथापि, "अ" किंवा "ब" प्रवर्गात नमूद केल्याप्रमाणे करोनाबाधेचे कोणतेही लक्षण नसणारे प्रवासी.

**आवश्यक कार्यवाही :** अशा प्रवाशांचे अंतिम गंतव्यस्थान राज्यात किंवा राज्याबाहेर कोठेही असल्यास अशा प्रवाशांना ते ज्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरले असतील त्या विमानतळाजवळ असलेल्या अलगीकरण कक्षात अलगीकरण करण्यात येईल किंवा संबंधित आयुक्तांनी जर अलगीकरणासाठी काही हॉटेल्स विनिर्दिष्ठ केली असतील अशा हॉटेलमध्ये संबंधीत प्रवाशाला त्याच्या स्वखर्चाने ठेवण्यात येईल जेणेकरुन प्रवासा दरम्यान होणा-या प्रादुर्भावास अटकाव होईल.

घरात अलगीकरणाबाबत निर्देशित प्रवाश्यांच्या बाबतीत खालील सूचना अंमलात आणण्यात याव्यात.

- ज्या व्यक्तीचे अथवा त्यांच्या नातेवाईकांचे वास्तव्य आंतरराष्ट्रीय विमानतळानजीकच्या शहरात आहे त्यांचेबाबतीत त्यांचे अलगीकरण त्यांच्या अथवा त्यांच्या नातेवाईकांचे वास्तव्याच्या ठिकाणी करण्यात यावे. संबंधीत प्रवासी जर नातेवाईकाच्या घरात राहणार असेल तर अशा वेळी त्या प्रवाश्याचे व त्याच्या नातेवाईकाचे नांव संपूर्ण पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांकाबाबतचे हमीपत्र ( Self Declaration) नोंदवून घेण्यात यावे. अशावेळी संबंधीत व्यक्ती व त्यांचे नातेवाईकाच्या भ्रमणध्वनीवर दूरध्वनी करुन खातरजमा करावी.

- अशा प्रवाशांना निवडणूकीसाठी वापरण्यात येणाऱ्या इंडेलीबल शाईने त्यांच्या तळहाताच्या पाठीमागे दिसेल अशा ठिकाणी अलगीकरणांचा कालावधीत नमूद केलेला स्टॅम्प मारण्यात यावा. हा स्टॅम्प १४ दिवस हातावर दिसू शकतो अशा प्रकारे मारण्यात यावा.
- अशा प्रवाशांचा संपूर्ण पत्ता, वास्तव्याचे ठिकाण व भ्रमणध्वनी क्रमांक याची नोंद करण्यात यावी. त्या व्यक्तीसमोरच त्यांच्या भ्रमणध्वनीवर दुरध्वनी करुन सदर क्रमांक चालू असल्याची खातरजमा करण्यात यावी.
- अनिवार्य अलगीकरण केलेली व्यक्ती अलगीकरण कक्षाच्या बाहेर, घरात अलगीकरण केले असल्यास घराबाहेर आढळल्यास अशा व्यक्तीवर फौजदारी कलम १८८ नुसार कारवाई करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी यांना असतील.

अलगीकरण करण्यात आलेली व्यक्ती ज्या क्षेत्रात वास्तव्यास असेल त्या क्षेत्रातील जिल्हाधिकारी अथवा महापालिका क्षेत्रात महापालिका आयुक्त यांनी त्या व्यक्तीच्या जवळच्या पोलीस ठाण्यात देखील अलगीकरण करण्यात आलेल्या व्यक्तीची संपूर्ण माहिती द्यावी व त्या क्षेत्रातील संबंधीत पोलीस स्टेशनने संबंधीत व्यक्ती ही घरातच आहे याची दररोज खातरजमा करावी. याबाबत सर्व माहिती एकात्मिक रोग सर्वेक्षण कार्यालय / राज्य करोना नियंत्रण कक्ष, पुणे यांना दररोज पाठवावी.

सदर सूचना या सक्षम प्राधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार निर्गमित करण्यात येत असून या सूचनांची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी. सुलभ संदर्भासाठी भारत सरकारच्या गृहमंत्रालय यांचेकडून दिनांक ११ मार्च २०२० रोजीच्या व आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाकडून दिनांक १३ मार्च व १६ मार्च २०२० रोजी प्राप्त झालेल्या सूचना सोबत जोडण्यात येत आहेत. या सूचना भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहेत.

(डॉ. प्रदीप व्यास)
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत अपर मुख्य सचिव (गृह)
प्रत अपर मुख्य सचिव (महसुल)
प्रत अपर मुख्य सचिव (ग्रामविकास)
प्रत अपर मुख्य सचिव (नगरविकास)
मंत्रालय, मुंबई
प्रत विभागीय आयुक्त, (सर्व)
प्रत आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई
प्रत संचालक, आरोग्य सेवा मुंबई / पुणे
प्रत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
प्रत मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
प्रत मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
प्रत मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव
प्रत खाजगी सचिव, मा. मंत्री (सा.आ.) मंत्रालय, मुंबई
प्रत खाजगी सचिव, मा. राज्य मंत्री (सा.आ.) मंत्रालय, मुंबई